# ई-विविधा

अंक : १  मार्च २०२६



आम्हा घरीं धन।
शब्दांचीच रत्ने।

~ संत तुकाराम

**कार्यकारी संपादक**

मंदार कुळकर्णी

**मांडणी व सजावट**

शकुनी

वैभवी देशमुख

मंदार कुळकर्णी

**संपादक मंडळ**

वैभवी देशमुख

शकुनी

नितांत पेडणेकर

माधवी मराठे

सुवर्णा लेले

**प्रकाशन व वितरण**

सुनीळ सामंत

ई-साहित्य प्रतिष्ठान

**मार्गदर्शक मंडळ**

संहिता हिस्वनकर

आनंद माने


**छायाचित्रे**

बाल्कनीतील निसर्गशाळा : मेघना सावे - शहा

माझे कॉस्मोपॉलिटन शेजारी: नितांत पेडणेकर

इतर सर्व छायाचित्रे : साभार आंतरजाल व AI


**सूचना**

ह्या अंकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखकांचे आहेत. साहित्यात लेखकांनी व्यक्त केलेली मते पूर्णतः त्यांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही. या अंकातील लेखनाचे आणि फोटोंचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे सुरक्षित असून पूर्ण लेखनाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(दंड व तुरूंगवास) होऊ शकते. हा अंक वेबसाइट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कुठल्याही कामासाठी वापरण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# संपादकीय

नमस्कार,

ई-साहित्य प्रतिष्ठानद्वारे प्रकाशित होणाऱ्या "ई-विविधा" नियतकालिकाचा पहिला अंक आपल्या हाती देताना आनंद होतो आहे.

आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आणि समस्त मराठी जनांसाठी "अजी सोनियाचा दिनू" असा दिवस उजाडला. मात्र अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून मराठी लोकांचे कार्य संपले असे नाही. ह्याउलट आपण सगळ्यांनी अधिक जोमाने काम करणे आवश्यक आहे.

आजच्या आंतरजालाच्या युगात, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात प्रत्येक व्यक्ती, देश, भाषा आणि संस्कृती आपापले स्थान शोधत आहेत. त्यात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती ह्यांचे स्थान काय असा प्रश्न कुणी विचारल्यास आपल्याकडे त्याचे उत्तर हवे.

ते उत्तर देण्यासाठी मराठी भाषा ही ठराविक वर्ग, माध्यमे आणि प्रांत ह्यांच्या पलीकडे जाऊन सर्वत्र पोहोचायला हवी. आता मराठी राजभाषा, जनभाषा झाली आहे, मात्र ज्ञानभाषा, युगभाषा होण्यासाठी बरेच प्रयत्न आवश्यक आहेत. त्यातलाच हा एक खारीचा वाटा.

आंतरजालावर मराठी साहित्य त्यामानाने कमीच. त्यातही दर्जेदार जे आहे ते सगळ्यांसाठी मुक्त आणि उपलब्ध अश्या प्रकारे बनवणे आणि त्याचा प्रचार, प्रसार करणे हे उद्दिष्ट ठेवून आम्ही सगळे हा नियतकालिकाचा उपक्रम हाती घेत आहोत. त्यासाठी आपल्या सगळ्यांचा विश्वास, प्रेम आणि शुभेच्छा असतीलच. आपल्याला हा अंक कसा वाटतो ते आम्हाला नक्की कळवा.
आपल्या प्रतिक्रियेच्या प्रतिक्षेत,

आपला विश्वासू,
मंदार कुळकर्णी
(कार्यकारी संपादक, ई-विविधा)
तसेच संपूर्ण संपादक मंडळ आणि ई- साहित्य प्रतिष्ठान.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| बाल्कनीतील निसर्गशाळा | 01 | मेघना सावे-शहा |
| आज मी पुन्हा लिहिणार आहे | ०३ | शिवम शिंदे |
| तगमग | ०४ | रोहित कुळकर्णी |
| जटायू कथा - १ | ०५ | पराग नाडकर्णी |
| झिनिया | ०९ | मंदार कुळकर्णी |
| गुलाब राणी | ११ | गायत्री साळवणकर |
| जगतो मराठी, जपतो मराठी | १२ | मीना खोंड |
| मायबोलीचा पदर | १३ | श्रद्धा हळदणकर |
| लेखिका | १५ | मधु शिरगावकर |
| माझे कॉस्मोपॉलिटन शेजारी | १८ | नितांत पेडणेकर |
| “आईचं” नसणं जिव्हारी लागतं | २२ | सनहा पठाण |
| स्वत:पलीकडेही एक जग असतं | २५ | श्रुति चापे |
| काव्या | २७ | पुजाली शिंदे |
| मनाचा प्रवास | ३२ | ज्योती कुळकर्णी |
| अनभिज्ञ | ३३ | कैलास बडगुजर |

# बाल्कनीतील निसर्गशाळा



 बालपण निसर्गसंपन्न अशा गावी गेले. त्यामुळे निसर्गाची ओळख पुढे आवडीत कधी बदलत गेली हे कळले देखील नाही. पुढे पर्यावरण हा अभ्यासाचा विषय झाल्यानंतर तर ही आवड अधिकच घट्ट होत गेली. निसर्गात घडणाऱ्या गोष्टींची कारणे समजत गेली.

तर अशी ही आवड शहरात आल्यावर जोपासणे जरा कठीण गेले. पण नंतर लक्षात आले की इथेही झाडे, झुडुपे, पक्षी, कीटक, फुलपाखरे आहेतच की. नोकरी निमित्ताने निसर्गभ्रमंती करताना निसर्ग अजून जवळून पाहता आला. पुढे तोच निसर्ग छोट्या स्वरूपात आपल्या बाल्कनीत आणूया असे ठरवले.




सुरुवात वेगवेगळ्या झाडे, वेली ह्यांच्यापासून केली. मग पुढे फुलांवर पक्षी, फुलपाखरे, भुंगे यायला सुरुवात झाली. पक्षी मधुरस प्यायला, तसेच झाडांवर जर कधी अळ्या आढळल्या तर त्या खायला येऊ लागले. पक्षांना प्यायला पाणी ठेवले तर ते पाणी पिण्यासाठी मधमाश्या देखील येऊ लागल्या. खायला अन्न ठेवले तर खारुताई देखील त्यावर ताव मारू लागल्या.



सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत बाल्कनीत काही ना काही घडू लागले. अर्थात दिवसभर ते बघत बसणे शक्यच नव्हते, पण जेव्हा कधी अश्या गंमती जमती नजरेस पडत तेव्हा खूप छान वाटे.

एक गंमत सांगते. शेजारचा छोटा त्याच्या मित्राला म्हणाला, “हे बघ काकींचे जंगल !” अर्थात हे माझ्या बाल्कनीच्या बागेसाठी होते. नंतर विचार केला की खरोखर हे एक छोटेसे जंगलच आहे आणि मला तसेच हवे होते कारण, माझी बागही निसर्ग साखळीला पूरक व्हावी अशी माझी मनापासून इच्छा होती आणि अजून पर्यंत तसेच घडत आहे याचा मला खूप आनंद आहे.

काही झाडांवर तर फुलपाखरांनी अंडी देखील घातली होती. त्यापासून अळ्या झाल्या आणि पुढे त्यांचे फुलपाखरू होणार या आनंदात मी असताना अचानक या गायब झाल्या तेव्हा कळले की काही अळ्या या पालीनी आणि काही पक्ष्यांनी खाल्ल्या. हे मला नंतर दुसऱ्या झाडांवरून कळले. वाईट वाटले, पण ठीक आहे, हा ही एक निसर्ग साखळीचाच भाग आहे असे म्हणून तेही स्वीकारले.

अशा गमती जमती बागेत खूपच घडत असतात आणि प्रत्येक वेळेस त्यातून मला काहीतरी नवीन शिकायला मिळते एवढे नक्की.





~ मेघना सावे - शहा
ठाणे, महाराष्ट्र
meghanasmail@gmail.com

# आज पुन्हा मी लिहणार आहे



वही अन् मेंदू माझा
धूळ खात पडलेला
झटकला की आला बाहेर
कवी आत दडलेला
गंजलेल्या त्या लेखणीला
धार आज लावणार आहे
आज पुन्हा मी लिहणार आहे

सुईसारख्या लेखणीत माझ्या
आठवणींचा दोरा ओवून
हृदयाच्या त्या नाजूक जागी
कागदाचं ठिगळ लावून
फाटलेलं नशीब माझं
जागोजागी शिवणार आहे
आज पुन्हा मी लिहणार आहे.

उरल्या सुरल्या दुखण्यासाठी
शाईचा तो मलम चोळून
ज्वलंत त्या कागदावरती
उकळवलेला काढा गाळून
साहित्याचं बाळकडू
डोळे लावून पिणार आहे
आज पुन्हा मी लिहणार आहे

विचारांचा पतंग माझ्या
शब्दाभोवती घिरट्या घेई
कल्पनेची हवा लागता
ढील देता, निर्भय होई
आभाळाशी भिडायला मी
त्या पतंगासोबत उडणार आहे
आज पुन्हा मी लिहणार आहे

लेखणी फिरवली अशी जणू
कागदावरती कथा उमटली
यमक जुळवले शब्दांचे अन्
क्षणात ही कविता प्रकटली
हातचलाखी जादूगाराची
आज तुम्हाला दिसणार आहे
आज पुन्हा मी लिहणार आहे

~ शिवम शिंदे
नांदेड, महाराष्ट्र
shivamshinde1233@gmail.com

# तगमग



तिन्हीसांजेच्या किनाऱ्यावर
येते सावळीशी भरती
खुणा प्रकाशित पावलांच्या
जराशा रेंगाळून सरती

गाव होई अंतर्मुख
वाजे स्मृतींचा पाचोळा
कुणी येतसे परतून
कशासाठी अशा अवेळा

रात्र अंथरूनी झाली
झोप पांघर घालेना
किती निश्वासून झाले
वारा जागचा हलेना

डोळा जागे पापणीत
स्वप्ने झोपवून वेशीवर
अंधार थकून वळला
पहाटे पश्चिम कुशीवर

जाग आली किनाऱ्यास
क्षितिज केशरी वरती
गाज सागराची ऐकताना
जन्म कित्येक स्मरती

~ रोहित कुळकर्णी
पुणे, महाराष्ट्र
rohkul092@gmail.com

# जटायू कथा -१

## भाग पहिला

किर्र....किर्र....किर्र.....

खोतांच्या नवीन वाड्यातील झोपाळ्यावर बसून दाजी खोत पान चघळत रात्रीचा कार्यक्रम ठरवीत होते. दाजी तसे बारा गावचे पाणी प्यायलेले एक दमदार व्यक्तिमत्व...वसई, गिरीग्राम, पुण्यनगरी, नागपूर अशा अंतरदेशीयच नव्हे तर फ्रान्स, चायना अशा परदेशीय वाऱ्या करून शेवटी कोकणात स्थिरावलेले. पण आज चतुर्थीची चंद्रकोर आकाशात उगवायच्या अगोदरपासूनच खोतांच्या मनात चलबिचल सुरू झाली.

कोणी केले हे कृष्णकृत्य...?

आज रात्री त्याचा छडा लावलाच पाहिजे.

खोतांनी मनोनिश्चय केला आणि रात्रीच्या अंधारात त्यांच्या कोल्हापूरी जोड्याचा पदरव आसमंतात घुमू लागला......

कर्र.....कर्र....कर्र...

कोणते होते ते कृष्णकृत्य...?

कोण होते त्या मागे...?

## भाग दुसरा

रात्रीच्या अंधारात खोतांची चाहूल लागताच त्यांचा साथीदार झटक्यात तयार झाला. अंग झटकून शेपूट हलवत वाघ्या त्यांच्या मागोमाग चालू लागला.

पण आज दार्जींच्या मनात विचारांचे काहूर माजले होते. हलकेच वाघ्याच्या डोक्यावरून हात फिरवताच त्या सहा फुटी श्वानाने दार्जींच्या बुलेटच्या साईडकारमधे सराईतपणे उडी मारली.

धग....धग....धग....धग.....

बुलेट मातीचा रस्ता सोडून हमरस्त्यावरून धावू लागली. आजूबाजूच्या किर्र आसमंतात दार्जींच्या बुलेटचा आवाज घुमू लागला. घराघरातील तान्ह्या पोरांनी अंग काढले. त्यांच्या आयांनी त्यांना छातीशी कवटाळून शांत केले. काहीतरी आक्रित आजच्या रात्री घडणार हे जाणून घरातील बाप्या लोकांनी पटापट दरवाजे बंद करून घरातील कंदील मालवले.

बुलेट वारा प्यायल्यासारखी सुसाट निघाली होती....

एकच ध्येय....एकच लक्ष्य....

आज रात्री त्या सावजाला...करायचे आपले भक्ष्य.

वाघ्याचे डोळे अंधाराचा वेध घेत चमकत होते.

आणि अचानक.....

बुलेटचे इंजिन दार्जींनी बंद केले.....

चारी बाजूंनी सन्नाटा पसरला.



त्यांची बुलेट आता उताराला लागली होती....आणि कोणताही आवाज न करता दाजींनी तो सव्वादोन मैलांचा उतार हलकेच पार केला होता.
बुलेट आता एका कमानीपाशी थांबली...आणि दाजींनी कमानीची पाटी मनातल्या मनात वाचली व दृढनिश्चयाने कमानीखालचे दार हलकेच उघडत ते आत प्रवेश करते झाले. वाघ्या आता त्यांच्या पुढे मार्गक्रमण करू लागला. त्याच्या नाकाने मांस जळण्याचा दर्प अचूक ओळखला होता.....अशा प्रकारे त्या कृष्णकृत्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठीच दाजींनी जीवावर उदार होऊन गावच्या स्मशानभूमीत प्रवेश केला.



**भाग तिसरा**

कर्र.....कर्र....कर्र.....
चालता चालता अचानक खोतांनी स्वतःभोवती झर्रकन गिरकी घेतली....आणि आपल्या मागावर असलेल्या दहा डोळ्यांचा क्षणार्धात वेध घेतला...आणि जणू काही काहीच झाले नाही अशा रितीने ते पुढे पेटलेल्या सरणाकडे चालू लागले.
ते पाच जण होते...दोन उजवीकडे दबा धरून आणि एक डावीकडे लांबवर...उरलेल्या मागच्या दोघांच्या हातातले अणकुचीदार कोयते दाजींच्या तीक्ष्ण नजरेतून त्या अंधारातही सुटले नाहीत.
झपाझप चालत त्यांनी सरणाला प्रदक्षिणा घालायला सुरूवात केली.

जणू काही कोणीतरी आप्त अंतिम दर्शन घेतोय.
एक-दोन-तीन आणि....अचानक...
तिसऱ्या फेरीनंतर दाजी जागच्या जागी गायब झाले. त्या दहा डोळ्यांचा स्वतःच्या डोळ्यांवरती विश्वास बसेना. ते पाच जण एक-दुसऱ्याकडे अविश्वासाने भूत बघितल्यासारखे बघू लागले......आणि त्याचवेळी.....
डाव्या बाजूच्याच्या मानेच्या नसेवर एक हलकासा प्रहार झाला आणि तो जागच्या जागी कोसळला. त्याचा आवाज होऊ नये म्हणून दाजींनी त्याला हलकेच जमिनीवर आडवा केला. वाघ्या हे सर्व काही नजरेने टिपत होता. त्याला आपल्या धन्याच्या सर्व खुब्या माहीत होत्या. त्यामुळेच काहीही आवाज न करता ते मुके जनावर त्वेष आवरून धन्याच्या बाजूला शांतपणे उभे राहिले.
दाजींनी आता परत आपला मोर्चा सरणाकडे वळवला....आणि जणू काही काहीच झाले नाही असे दर्शवत ते सरणाच्या बाजूला हात जोडून उभे राहिले.
आणि.....उरलेले आठ डोळे....उरलेले आठ डोळे त्वेषाने चमकले. त्यापैकी उजवीकडील दोघेजण कोयते पारजून पुढे सरकणार.....एवढ्यात....
भो.....भो....भो....स्मशानातील तीन-चार भटकी कुत्री वाघ्यावर चाल करून गेली....आणि काही कळायच्या आतच.....कुई....कुई....कुई करत धूम पळाली....वाघ्याने एका झटक्यात त्या कुत्र्यांच्या गॅन्गच्या म्होरक्याच्या मानेचा करकचून चावा घेतला होता. काही कळायच्या आतच ती कुत्री मसणवट सोडून दिसेनाशी झाली.
आता उरले फक्त.....वाघ्या...जळणारे प्रेत....ते चार जण...
आणि....दाजी....दाजी खोत.

**क्रमशः**

~ पंपूशेठ पन्हाळकर (पराग नाडकर्णी)
माहीम, मुंबई
parry707@gmail.com

# झिनिया

मॅजेंटा रंगाची अनभिषिक्त सम्राज्ञी...
निसर्गचित्र कलेची सुरूवात...
प्रस्तुत आहे झिनिया !



श्रावण संपत आलेला असतो आणि शरदाची चाहूल लागलेली असते असा हा काळ. रस्त्यारस्त्यांच्या कडेने मातीतून उगवतात ती झिनिया ची रोपे. यांच्या पानांना देठ नसतो, तर उगवतातच ती खोडांवर. हळूहळू रोपाला येते ती कळी, जणू काही फुलराणीचा चेहरा वाटावा. या कळ्या असतातही सुंदर, बालकथांतील बाहुल्यांच्या राजकुमारी सारख्या. मॅजेंटा रंगाच्या पाकळ्यांचा केशसंभार. नाक आणि डोळे वाटावे असा देठ. एका अबोल इटुकली परी आपल्याकडे कितीतरी वेळ झाला पाहतेय आणि काही क्षणात बोलू लागेल असे ते ध्यान.

फुलाचे रूप तर आणखीनच मोहक! देवाने मॅजेंटा रंग हा खास हिच्यासाठीच राखून ठेवला असावा. कारण फक्त पाकळ्यांमध्येच या रंगाच्या अनेक छटा दिसून येतात. डोक्यावर तो तपकिरी रंगाचा मुकुटच जणू! मुकुटाच्या कळसावर ते पिवळे तुरे आणि

जागोजागी सोनेरी तुऱ्यांचं आवरण. मुकुटाच्या काठावर आणि पाकळ्यांच्या मध्यात सोनेरी कड्या. बरोबरच म्हणा! वनाच्या राजकन्येला कशाला हवी माणसांची आभूषणे? तिची आभूषणे तिच्या सारखीच असतील, नाही का? काही हिरवी, नारिंगी, निळी, पिवळी तर काही तांबूस, तपकिरी. त्या माती सारखी, सारी तिचीच लेकरे.....झिनिया अशी एखाद्या शालीन स्त्री प्रमाणे डौलात उभी असते. रुबाब राजेशाही पण वागणं निरागस कुमारिकेचं. एखाद्या वातलहरीशी गट्टी जमली रे जमली की लगेच फुगडी खेळणं सुरू.

शरद ऋतूचे हे बाळस रूप पाहिलं की मन अगदी प्रसन्न होतं. ही अशी रस्त्यांच्या, पायवाटांच्या कडेकडेने उमललेली फुले पाहून मनाला वाटतं, की आपले सौंदर्य कुणी न्याहाळावं, एखाद्या रसिकाने आपल्या फुलाला अलगद हातात घेऊन निरखावं आणि वाटलंच तर रानावनात वाढलेले रोप आपल्या अंगणात लावावं, म्हणून दाटीवाटीने बसलेल्या ह्या निसर्गकन्या वाटसरूंच्या डोळ्यांना सुख देण्यासाठी वाट पाहत राहतात.

~ मंदार कुळकर्णी
बावधन, पुणे
mandarmilindkulkarni@gmail.com

# गुलाब राणी

गुलाब राणी, गुलाब राणी, सांगतेस का मला
इतकं देखणं रूप बाई, कोठून मिळाले तुला?
लालचुटूक आहेत, गाल खूप तुझे
पाहूनिया भान हरले गं माझे ।।१।।



मोहक तुझे रुप, तुझी ऐटच न्यारी
तू मला सर्वांहून आहेस गं प्यारी
ए! सकाळच्या वेळी का गं रडतेस?
नाजूक तुझे अंग तू दवबिंदूत भिजवतेस! ।।२।।

कंटकाची शय्या कुणी पांघरली खाली
म्हणून, तुझ्या डोळ्यात आसवे का आली?
अगं, रामानेही भोगला होता वनवास
वेडे पूस डोळे आणि पुन्हा पाहू हांस ।।३।।

~ गायत्री साळवणकर
जवाहरनगर, कोल्हापूर
gayatri.salvankar@gmail.com

# जगतो मराठी, जपतो मराठी..

मराठी बोलतो, मराठी वाचतो
आम्ही मराठी जतन करतो
मधुर मराठी मातृभाषा आमुची
मराठी माणूस मराठी जगतो....!

संस्कार, संकृती, परंपरा, रीती
दिवाळी गणपती साजरे करतो
जल्लोश-उत्साह-वैभवात जोमात
मराठी सण संपन्न करतो...!

मैत्र, स्नेहबंध, प्रेम, नातेबंध
जीवनात जपण्याचे भान ठेवतो
मराठी भाषेचे अप्रूप परदेशात
मराठी जगण्याची जाण ठेवतो...



देश तसा वेश, उक्ती ही पाळून
गुण्यागोविंदाने विदेशात राहतो.
नाळ असते येथे मातीत पुरलेली
मराठीपण विदेशात जपतो...!

देशात मराठी, विदेशात मराठी
मराठीचा अभिमान आम्ही बाळगतो
विश्वात वाढवते भाषा मराठी
माझ्या मराठीचे गौरवगान गातो...

मेधावी, मेहनती, इमानी, कार्यनिष्ठ
संधीचे आम्ही सोने करतो
समाजात स्थान निर्माण करूनी
अटकेपार मराठीचे झेंडे फडकवितो ..!

~ मीना खोंड
हैदराबाद, तेलंगणा
meenakhond@gmail.com

# मायबोलीचा पदर

महाराष्ट्राच्या तरूची
माय मराठी सावली |
मला नित्य वंदनीय
माझ्या वाणीची माऊली ||



गोमटेशाच्या चरणी
जन्मली एक ओळ |
मुकुंदाच्या ग्रंथामध्ये
दिसे रूप लडिवाळ ||

ती शाहिरीची उर्जा
तिचा लावणीचा साज |
गोड शब्दांनी जिंकली
तिनं अमृताशी पैज ||

रंग अभंगाचा होई
कधी अंगाईचे गीत |
ओवी गाते जात्यावरी
जणू श्रीहरीचा हात ||

ती तुकयाची गाथा
तीच शिवाची तलवार |
या मातीच्या शौर्याला
तिनं नेलं अटकेपार ||

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी
जे हाती घेती प्राण |
त्यांसवे राही उभी
जागाविण्या लोकमन ||



या शारदेची किती
गावी थोरवी अवीट |
तिच्या डोईवर साजे
राजभाषेचा मुकूट ||

कैक कवींची ही स्फूर्ती
सरिता अस्मितेची |
का आली क्षीण अशी
मूर्ती तीं अमृत तेजाची ||

का वेगळा हव्यास
का तिला बंद दार |
कुठं चालला सोडून
मायबोलीचा पदर...?

~ स्नेहसुता (श्रद्धा हळदणकर)
मुंबई, महाराष्ट्र
haldankarshraddha2000@gmail.com

# लेखिका

तिचं कथा लेखन सुरू आहे.
अवंतिका डोळे मिटून शांत बसते. समाधानाची लाट तिच्या मनावर अलगद पसरत जाते. लिहिताना ती खूप आनंदी असते. लेखणी झरझर चालते. भावना ओघवत्या असतात. लेखनाचा प्रत्येक क्षण ती जगत असते. हसणं, रडणं, रागावणं, समजावणं, हार, जीत, सगळं सगळं. त्या उचंबळून येणाऱ्या भावना, तिला संपूर्ण जगल्याची अनुभूती देतात. म्हणूनच ती खूप खुश असते लिहिताना. सगळं कसं तिच्या आवाक्यात असतं.
काही वेळ ती अशीच बसून राहाते. स्थळकालाचं भान हरपून जातं. अचानक एक भक्कम पंजा तिचे डोळे झाकतो. "श्री" , ती त्या स्पर्शाने त्याला ओळखते.
"काय बाईसाहेब, झाली वाटतं कथा पूर्ण?" चहाचा वाफाळता कप तो पुढे धरतो, सोबत ताजी कचोरी. तिला अचानक भुकेची जाणीव होते. 'जेवलोच नाही आपण.'
"अरे, तू चहा करून आणलास? हाक मारायची ना मला."
"तंद्री लागली होती तुझी, किती मग्न होऊन लिहीत होतीस. मी लॉक उघडून आल्याचेही कळलं नाही तुला."
"सॉरी "
त्याचा एक हात तिला जवळ घेतो. "असू दे, तू खा कचोरी, मस्त गरमागरम आहे बघ."
ती क्षणभर त्याच्या खांद्यावर डोकं टेकून डोळे मिटते.

दारावरची बेल खणखणते. एकदा, दोनदा, तीनदा.. ती दचकून डोळे उघडते. आता त्याबरोबरच श्रीचा चिडका आवाज तिला हाका मारत असतो. ती चटकन उठून धावते दाराकडे. घाईघाईने दार उघडते.
"अगं काय करत काय होतीस? केव्हाचा दरवाजा बडवतोय मी! लॅच असताना आचरटपणा करून आतून कडी का लावलीस? माझा मी आत आलो असतो ना? नसती कटकट."
"सॉरी"
"कसली कुंभकर्णाची झोप ही?"
"नाही, झोपले नव्हते, मी लि.."
"चहा टाक पटकन, खायला केलंय का नाही काही? मला निघायचं आहे लगेच."
"अं, करते पटकन काहीतरी."
"अशक्य झाली आहेस. राहू दे आता. चहा दे फक्त. खाईन मी बाहेरच काहीतरी. मर मर मरायचं यांच्यासाठी. आणि घरी यांची ही थेरं." धाडकन दरवाजा आपटून श्री शॉवर घ्यायला निघून जातो.
तिची सगळी शक्तीच नाहीशी झाल्यासारखं वाटतं तिला. ती तशीच पाय ओढत ओट्याजवळ जाते. डोशाचं पीठ असतं ओट्यावर. ती पटकन डोसे घालते दोन तव्यांवर दोन. चटणी करते, एकीकडे चहाचं आधण ठेवते. श्री तयार होऊन येतो तेव्हा टेबलवर मस्त कुरकुरीत डोसे चटणी , त्याची वाट पाहात असतात. तो भराभर खातो. तिने दिलेला चहा पिऊन कारची किल्ली घेऊन बाहेर पडतो. "जेवायला घरी नाहीय मी. आणि आतून कडी लावू नकोस, कळलं?"
तिने हलवलेली मान पाहायला श्री थांबलेला नसतो. कार स्टार्ट केल्याचा आवाज फक्त.

खिडकीतून दिसणारी संध्याकाळची किरणं तिला खूप आवडतात. दरवाजाची बेल परत खणखणते. दोनदा. तीनदा. ती नुसतीच बसून राहते. पाठोपाठ हाका.  ....ती मग पटकन जाऊन दरवाजा उघडते. श्री झटक्यात आत येतो, आसपास पाहतो.  "आर यू ऑलराईट ? अगं, अंडी आणायला म्हणून गेलो, तेवढ्यात तू आतून कडी लावलीस. बरं वाटतंय ना तुला? डॉक्टरकडे जाऊया का? डोळे किती खोल गेलेत. मला फार काळजी वाटते तुझी. प्लीज, आतून कडी नको लावत जाऊ. आणि हे काय? अर्धी कचोरी देखील गेली नाही तुला? असं केलंस तर तब्येत कशी सुधारणार तुझी? आपण कुठेतरी जाऊया का चार दिवस? निवांत जाऊन राहूया कुठेतरी? फक्त तू आणि मी?"
ती श्रीच्या डोळ्यांमध्ये पाहत होकारार्थी मान हलवते.

अवंतिका, श्रीच्या या प्रेमळ व्यक्तिमत्त्वाला फायनल करते. त्या अनुषंगाने सगळी कथा रचते. अत्यंत समाधानाने कागद नीट रचून पाकिटात घालते. पत्ता लिहिते.पाकीट घेऊन बाहेर येते. हॉल मध्ये ठेवलेल्या श्रीच्या फोटोवरचा हार नीट करते.
दिवाळी अंकासाठी शेवटची कथा पूर्ण झालेली असते. आता ती दिवाळी मस्त एन्जॉय करू शकणार असते.



~ मधु (मृण्मयी) शिरगांवकर
पुणे, महाराष्ट्र
madhushirgaonkar@gmail.com

# माझे कॉस्मोपोलिटन शेजारी

होय! माझी दा. नौ. नगरमधील विभाग २ मधील ९ क्रमांकाची चाळ, म्हणजे एक मिनी भारतच होता.

माझ्या शेजारी (मी पहिल्या मजल्यावर) मल्याळी कुटुंब, दुसऱ्या मजल्यावर जिन्याच्या डावीकडेही मल्याळी कुटुंब, त्यांच्या बाजूला पारशी कुटुंब, माझ्या वर 'देव', 'प्रभू', उजव्या बाजूला 'ईश्वर' खैरमोडे,



त्यांच्या बाजूला भालेराव (इमारतीतील एकुलता १ दूरध्वनी संच असलेले), खाली पोटे (७ मुली आणि नंतर २ मुलगे असलेले), त्यांच्या बाजूला सुब्रमण्यम (तामिळ). हे ७ वाजताच तेल लावून आंघोळ करायचे आणि सूर्यास्तापूर्वीच जेवायचे. खेळ भरात आलेला असताना त्यांची मावशी मुलांकडे येऊन पो! पो! (घरात जा) करायची. माझ्या मनात पहिल्या अंधश्रद्धा (चप्पल उलटी ठेवली तर भांडणे होतात वैगेरे) त्यांनीच भरवल्या, ज्या आजही गेलेल्या नाहीत.

माझ्या खाली तळमजल्यावर खन्ना - त्यांचे १ कैरीचे झाड होते, त्याच्या कैऱ्यांवर संपूर्ण दा नौ नगर आणि शीतला देवी वस्तीचा डोळा होता. सौ. खन्नांना कुठल्या फांदीवर किती कैऱ्या लागल्यात ते पाठ होते. शिव्या तर अशी द्यायची की वस्तीतल्या लोकांची हिंमत नव्हती तिच्यासमोर उभे राहायची. नंतर त्यांच्या जागी चंपानेरी, गुजराती कुटुंब आले.

सौ. चंपानेरी गिरगावच्या, कधी कधी हळूच नवऱ्याच्या न कळत आमच्याकडे येऊन मासे खायच्या. त्यांच्या बाजूला गुजराती कुटुंब, मधल्या विंगमध्ये त्यांच्या शेजारी ख्रिस्ती राहायचा, आम्ही त्याला रॉबिन्सन क्रूसो म्हणायचो. सर्व कामे सुतारकाम, विजेची वैगेरे एकट्यानेच करायचा, व्यावसायिकाची मदत घ्यायचा नाही. त्यांच्या बाजूला गोवेकर, खादी ग्रामोद्योग मध्ये कामाला, आम्हा पोरांना सर्कस बघायला घेऊन जायचे. नंतर त्यांच्या घरी परब आले, बाजूला आधी शेट्टी, मग हेगडे (कर्नाटकी), वर पहिल्या मजल्यावर पंजाबी चित्रपट दिग्दर्शक, या बाजूला पाटील, वर दुसऱ्या मजल्यावर खान (ईदला खीर व कुर्मा नक्की मिळायचा घरपोच), बाजूला गोवेकर, त्यांनी आम्हाला परळच्या गणपतीचे जवळून दर्शन घडवले होते कारण काकीचा भाऊ मूर्तिकार होता.

त्यांच्या बाजूला राव (कर्नाटकी) एअर इंडियन तंत्रज्ञ, बाजूला व्यवहारे, त्यांच्या बाजूला पहिल्या विंग मध्ये दुसऱ्या मजल्यावर निंबाळकर, राव (नवरा तमिळ सैन्यात, पत्नी मराठी शिक्षिका), पहिल्या मजल्यावर शाह (गुजराती), कांबळे आणि १ मराठी कुटुंब (बँकर), खाली कन्नड (त्यांचा थोरला मुलगा माझ्यापेक्षा १ वर्षाने लहान!). मी त्यांच्या घरी अभ्यासाला जायचो. एकदा फाऊंटेन पेनमधील शाई त्यांच्या बिछान्यावर सांडली, तेव्हापासून माझे तिथे अभ्यासाला जाणे बंद झाले. बाजूला तळमजल्यावरच मराठी दंतवैद्यिणीचा दवाखाना होता.



जिन्याच्या डाव्या बाजूला बंगाली, त्यांचा कलकत्त्याचा पुतण्या आमच्याबरोबर खेळायला यायचा. नंतर आमचे त्या मुलाशी भांडण झाले. तो नंतर परत कुठे गेला, सध्या कुठे आहे काहीच पत्ता नाही.

शेजारी एका मराठी डॉक्टरांचा दवाखाना! सुरुवातीस २० रुपये फी असल्याने संपूर्ण शीतलानगरची वस्ती त्यांच्याकडे उपचाराला यायची. हळूहळू फी वाढवल्यावर गर्दी कमी झाली. नंतर एलआयसीचा विमा, आंबे, मेंदीचे कोन वगैरे पण विकायला लागले. त्यांच्यावर एकदा घरी जाताना चाकू दाखवून लुटमारीचा पण प्रयत्न झाला होता. खूप हळू आवाजात बोलायचे. माझ्या वडिलांना, त्यांनी जबरदस्तीने लुटू पाहणाऱ्या इस्पितळात भरती होण्यास सांगितल्याने माझ्या वडिलांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला होता. माझा धाकटा भाऊ मात्र अमेरिकेतून आल्यावर आजारी पडला तर त्यांच्याकडेच जायचा, त्याला आराम मिळायचा. मी मात्र त्यांची औषधे (तेव्हा डॉक्टरच आपल्याकडील ज्या रंगीबेरंगी गोळ्या आणि एक लालसर औषध बाटलीतून द्यायचे) बाहेर येऊन गटारात टाकून दिल्यावर आपोआप बरा व्हायचो!

आमच्या ९ नं. मध्ये माझ्या थोरल्या भावाचे लग्न होते तर आमच्या पाहुण्यांना झोपायला शेजाऱ्यांनी आपापली घरे उघडली. फक्त २५० चौ. फूट क्षेत्र!



आई वारली तेव्हादेखील संपूर्ण इमारत मदतीला धावली. पण चाळीचा एक फायदा होता, घराचे दरवाजे सगळ्यांकरिता उघडे होते. आता मी ज्या सोसायटीत राहतो तिथे एक पारशी म्हातारा दोन दिवस मरून पडला होता तर शेजाऱ्यांना पत्ता नाही, एका स्त्रीला लकवा झाला तर तिला इस्पितळात नेण्यासाठी उचलून नेताना शेजाऱ्यांनी दार बंद केले.

ह्या चाळीतील वास्तव्याच्या २५ वर्षांनी माझे विचार सुद्धा व्यापक केले. तेथील विविध संस्कृतींच्या दर्शनाने आणि आपुलकीने मला बंधुभावाची शिकवण दिली जी आजही कायम आहे.

~ नितांत पेडणेकर
बोरिवली पूर्व, मुंबई
nitant.pednekar@gmail.com



# "आईचं" नसणं जिव्हारी लागतं

काळजी, फिकीर, चिंता
करणारी नाही आता
क्षणाक्षणाला जाणवतं...
एक भाकरी कमी खाल्ली
तरी का नाही खाल्ली म्हणून
विचारणारं कोणी नसतं
हे ती गेल्यानंतर उमजतं...
माझ्या आवडीचं,
तिच्या मायेचं जेवण,
आता खावं वाटलं तरी सांगा कुठं मिळतं?
“आईचं” नसणं जिव्हारी लागतं...



मतलबी दुनियेत
सगळे स्वार्थापुरते
निःस्वार्थी होती फक्त ती
नऊ महिने स्वतःच्या उदरात
आणि आयुष्यभर होतो तिच्या मायेच्या पदरात
उद्धट बोलणं, तिच्यावर चिडणं, ओरडणं
आणि तरीही मायेपोटी सगळं सहन करणारी आयुष्यातली पहिली आणि शेवटची स्त्री फक्त तीच.
आता मुलगी असो वा बायको, आईला बोलताना ताबा न ठेवणारा मी,
ह्यांना बोलताना विचार करून शब्द वापरताना दिसतो.
तिचं मन कधीच जपलं नाही,
आता सगळ्यांची मनं जपता जपता
आपल्याला जपणारी गेली, एवढंच कळतं....
“आईचं” नसणं जिव्हारी लागतं...

सकाळी खाल्ल्याशिवाय घराबाहेर न जाऊ देणारी,
उशीर झाला की हमखास फोन करणारी,
ऑफिस वरून आलं की थरथरत्या हाताने चहाचा कप आणणारी "आई"
घरात आता दिसतं नाही.
शोधून होतं नकळत सगळीकडे,
बेडरूम मध्ये झोपली का?
मी आलो म्हणून चहा करत असावी,
कदाचित देवापुढे दिवा लावत असावी,
शोधून थकतो, नाही दिसत कुठेच,
तिझ्या खोलीत गेल्यावर भान येतं.
तिचा तो चष्मा, तिची वाट बघत
थकलेले देवघरातील ते देव
आणि कपाटात तिला शोधत पडलेले कपडे
एवढंच मागे दिसतं.

"आईचं" नसणं जिव्हारी लागतं...

लेकरा लेकरा करत घरभर फिरणारा तो जीव,
क्षणात नाहीसा होतो,
आपण गृहीतच धरतो तिचं असणं कायम
आणि तिचं अचानक जाणं जिव्हारी लागतं.
लहानपणीच काय ते तिला मिठी मारलेली,
मोठेपणी इतका मोठा झालो वाटलं,
आणि मिठी मारायचं राहून गेलं,
आठवते रोज आजकाल.
तिच्या नसण्यानं, आता आयुष्य जगल्यासारखं वाटत नाही,
तरीही तिच्या आठवणीत ती नसल्यासारखं वाटत नाही...

"आईचं" नसणं जिव्हारी लागतं...

तिच्या आठवणीत आता रात्रीची झोप लागत नाही
कोणीतरी हळूच मायेने कुशीत घ्यावं,
पण ती माया आता भेटत नाही.
डोळ्यात पाणी दाटून येतं
आणि मन मात्र बालपणात हरवतं...
आई म्हणजेच विश्व
आणि कालांतराने ते विश्वच जणू हरवून जातं...

**आणि शेवटी “आईचं” नसणं  जिव्हारी लागतं...**



~ सनहा पठाण
अकलूज, सोलापूर
sanaha.pathan@gmail.com

# स्वत:पलीकडेही एक जग असतं...



स्वत:मध्येच गुंतून राहिले तर,
दुसऱ्यांचे दुःख कसे दिसणार?
हरवलेल्या प्रत्येक चेहऱ्यामागचे हसू,
पुन्हा कसे आणणार?

स्वत:साठी खूप जगले,
आता दुसऱ्यांसाठी जगणार,
रडणाऱ्या प्रत्येक चेहऱ्यावर,
गोड हसू पुन्हा बघणार.

सगळ्यांच्या दु:खांची कारणं,
मला नक्कीच कळावी,
दुसऱ्यांच्या अंधारमय जीवनात,
मला प्रकाशाची जागा मिळावी.

मला सगळं मिळालं म्हणून,
आयुष्य पूर्ण नाही झालं,
कुणाच्यातरी अश्रूंना आपलंसं केल्यावरच,
जगणं खरं वाटलं.

सहज विचार मनात आला,
जगणं केव्हा पूर्ण होतं,
मग शब्दांनीच उत्तर दिलं,
सगळं काही आपलं नसतं

स्वत:पलीकडेही एक जग असतं.

~ श्रुती चापे
गंगानगर, संभाजीनगर, महाराष्ट्र
shrutichape2@gmail.com



# काव्या

तसा तर तो काळ संपूर्ण जगासाठी एक कठीण परीक्षाच होती; परंतु कोविड-19 काव्याच्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी देऊन गेला.
हो, काव्याच्या अस्तित्वाचा बळी घेतला होता या अतिसूक्ष्म पण प्राणघातक कोरोना विषाणूने.
आपला भारत देश सुशिक्षित तर होतोय, पण अजूनही जातीभेद, वर्णभेद यांसारख्या तुच्छ विचारांच्या विळख्यातून पूर्णपणे बाहेर पडला नाहीये.
दोन वर्षे वाट पाहिली काव्या आणि शिवने लग्नासाठी आणि घरच्यांची मान्यता, त्यांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी.
शेवटी त्यांच्या प्रेमापुढे घरच्यांना त्यांचे ते जातीवादी विचार त्यागावे लागले आणि सरतेशेवटी घरच्यांच्या आणि देवाब्राम्हणांच्या साक्षीने शिव-काव्याच्या लग्नाचा बार उडाला.
लग्नात मोठ्यांनी भरभरून आशीर्वाद दिले होते की, नजर न लागो या "लक्ष्मी-नारायणाच्या" जोड्याला. पण नियतीने त्या दोघांसाठी काहीतरी वेगळेच योजले होते.
न जाणो कुण्या जन्माचा शाप होता की, खरंच नजर लागली कुणाची, त्यांच्या विठू-रखुमाई परी गोड संसाराला...

त्या सटवाईने काव्याच्या नशिबी सुख लिहिले खरे, पण काही काळापुरतेच...
संसार थाटण्याच्या वयात, वैधव्य वाट्याला आलेली अभागी काव्या...
लग्नाच्या अगदी चार महिन्यांतच, तिचं संपूर्ण अस्तित्वच हिरावून घेतलं त्या क्रूर, निर्दयी काळाने...
किती विक्षिप्त असतं ना हे दुःख..?
सहनही होत नाही आणि व्यक्तही करता येत नाही.
विरह! अदृश्य पण जन्मभर मनाला ठसठणारी एक ओली भळभळती जखम...
मनाला जडलेला एक दीर्घ आजार.
या दुखण्यातून बाहेर पडण्यासाठी एकतर सहनशक्तीची पराकाष्ठा गाठावी लागते. अन्यथा सर्वात सोपा आणि सरळ मार्ग उरतो तो म्हणजे "आत्महत्या"!
हो आत्महत्याच!
त्या वेदनादायी परिस्थितीत काव्याच्या मनात आलेला पहिलावहिला भावनिक विचार...
ज्यातून ती कायमचीच या दुःखातून सुटणार होती आणि त्या विचाराला पूर्णत्वाकडे नेण्यासाठी एका मध्यरात्री घरच्यांच्या नकळत ती एकटीच घराबाहेर पडली.
तिच्या मनात एक विचित्र भीती आणि असंख्य विचारांचं वादळ घोंगावत होतं.
ते वादळ भावनाशून्य मनाला देहासकट कुठेतरी वाहून नेत होते.

थोड्या वेळाने एका भकास तळ्याकाठी येऊन तिचे पाय क्षणभर थांबले आणि हळूहळू पुन्हा पुढे सरसावले.
पाण्याचा थंडगार स्पर्श गुडघ्यांना जाणवू लागला आणि अचानक तिच्या मनातील विचारांचे वादळ थोडे क्षमले.
अचानक तिच्या मनाच्या खोलवर आतून एक आवाज आला, "इतके स्वार्थी होते का माझे प्रेम, जे तुला इथवर घेऊन आले? मी ज्या काव्यावर प्रेम केले ती काव्या इतकी डरपोक तर कधीच नव्हती. ती काव्या तर निडर आणि आत्मसंयमी होती. नकारात्मक गोष्टींना आपल्या सभोवताली जराही भटकू देत नव्हती. क्षणभरातच सकारात्मकतेचा मार्ग शोधत होती. पण आज, आज तू या एकटेपणाचा भितीने स्वतःचे आयुष्य संपवायला निघालीस? कोण आहेस तू? कुठे हरवली ती काव्या, जिने माझ्या सारख्या कठोर पुरुष मनाला अगदी हळुवारपणे गोंजारून माझ्या जीवनाला एक नवे वळण देऊ केले? कुठे आहे कुठे माझी ती काव्या?
खरंच आपल्या प्रेमाच्या आठवणी तुला तुझं आयुष्य संपवावे वाटले इतक्या वाईट होत्या का??
माझेच प्रेम अपुरे पडले असावे कदाचित... कारण तू तर मला भरभरून प्रेम दिले आणि तुझ्या या प्रेमामुळे मला मृत्यूला आलिंगन देतानाही भय नाही वाटले. कारण मला माहिती होते जरी माझे शरीर जरी माझी साथ देत नसले तरी माझी काव्या माझ्यासोबत कायम आहे ती माझ्या प्रेमाला मरू नाही देणार. ती शोधेलच असा कुठला तरी मार्ग ज्यातून ती मला कायम तिच्या जीवनात ठेवेल मला खात्री आहे..."



काव्याच्या मनातला शिव तिच्यासोबत बोलत होता. त्याच्या त्या आवाजाने काव्या जागच्याजागी दगडासारखी स्तब्ध झाली...
एक सळसळती वीज तिच्या सर्वांगावरून फिरत गेली.
नकळत तिची पाऊले पुन्हा मागे वळली.
तिच्या त्या पांढऱ्या फिकट चेहऱ्यावर असह्य भावना झळकू लागल्या.
आसवांचे बांध फुटून डोळ्यांना पूर आला आणि त्या पुरात तिच्या सर्व वेदना वाहू लागल्या.

तिथून सुरू झाला काव्याच्या आयुष्याचा एक नवा प्रवास. हो तिला तिच्यातला सकारात्मकतेने शिवला जिवंत ठेवण्याचा मार्ग मिळवून दिला होता.
तिचे दुःख, तिचा विरह आणि एकांत.... आज ती तिच्या लेखणीमार्फत मुक्तपणे उधळत, आयुष्याच्या निळ्याशार गगनात उंच भरारी घेत होते...
दुःख... आयुष्यात येताना कायम दोन मार्ग घेऊन येते एक ज्या मार्गावर माणूस स्वतःचे अस्तित्व गमावून बसतो आणि दुसरा म्हणजे एक ज्यावर माणूस स्वतःचे एक नवीन अस्तित्व निर्माण करतो...
काव्यानेही आज स्वतःचे एक नवीन अस्तित्व निर्माण केले आहे...

~ पुजाली शिंदे
दिवा - ठाणे, महाराष्ट्र
shindepoojali23@gmail.com

# मनाचा प्रवास

मन माझे का दोलायमान
कधी मधी का झुलते झुरते
कधी सुखाने अन् दुःखाने
सगळे असूनी उगाच कुढते

अर्थ जीवनी कशात आहे
अशी अनामिक हुरहुर दाटे
सारे जर का क्षणभंगुरच
जगणे मजला नीरस वाटे

जाते मी मन रमवायाला
सरगमेतला सूर हरवला
कोठे जावे मला कळेना
'सा रे ग म' ही शोधायाला

साद घातली मीच मला मग
नीरसातही रस ओताया
जीवन दिधले जरी नाशिवंत
सांगितले का सदा रडाया

द्यावे घ्यावे सदा फुलावे
हसून जगणे गोड करावे
हेच स्वतःचे धन समजावे
वारसास ते ठेऊनी जावे



~ ज्योती कुळकर्णी
अकोला, महाराष्ट्र
jyotikulkarni2211@gmail.com

# अनभिज्ञ

**‘रात्रीच्या गर्भातच आहे उद्याचा उषःकाल’ –**



ह्याच आशेने की भ्रमाने आपण धावतच राहतो. ‘वेडात मराठे वीर दौडले सात’ तसे जसे काही आपल्याला सुवर्णमृगच मिळणार आहे या आशेने, शेवटी जाताना रिक्त हातानेच जायचे आहे हे माहीत असूनसुद्धा हव्यास सुटत नाही. माझे माझे करण्यातच जन्म जातो पण मोह जात नाही.

संचिताचे भोग भोगत असताना नवीन चांगले कर्म करायची जरी इच्छा झाली तरी जगन्नियंत्याने आपल्याला आपले कर्म ठरवूनच जन्म दिला आहे. तर मग आपण कठपुतळीच्या खेळातील बाहुल्याच आहोत. आपला पराक्रम तो काय? शेवटी कर्ता करविता तोच आहे म्हटल्यावर आपले स्वतःचे अस्तित्व ते काय? स्वतःचे स्वत्व गमावून त्याच्याच इच्छेनुसार चालणाऱ्या खेळातील आपण खेळाडू तर नाहीत?

खेळ ठरलेला आहे आणि खेळाचा निकालही! मात्र आपल्याला अनभिज्ञ ठेवून अपेक्षांच्या भ्रमावर धावायला लावणारा तो पडद्याआडचा सूत्रधार मला जरा निर्दयीच वाटतो. कधी कधी मध्येच एखादा अनपेक्षित निर्णय देऊन तो ‘मी किती प्रेमळ आहे’ असा भ्रम निर्माण करतो आणि याच भ्रमाच्या शिदोरीवर माणूस पुढच्या अनपेक्षित निर्णयाची वाट पाहत वाटचाल करत राहतो, डोळ्यावर पट्टी बांधलेल्या गांधारीसारखा! आपल्याला असे वाटते की आपल्या भोवती सर्व जग फिरते आहे, पण हा भ्रम असतो. उलट आपणच कोणत्यातरी अज्ञात शक्ती भोवती फिरत असतो… अनभिज्ञपणे!

~ कैलास बडगुजर
टिटवाळा, ठाणे
kailasbadgujar3@gmail.com

*आपण लेखक किंवा कवी आहात का?*
*आपल्याला स्वतःचे लिखाण प्रकाशित करायचे आहे का?*

**आमच्याशी संपर्क साधा :**

esahity.com

@evividha.magazine

Evividha Esahity Magazine

evividha.magazine@gmail.com